दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

• वर्ष १७ वे • अंक २५० • MAHMAR/2006/17212 • रायगड • शनिवार दि.१० डिसेंबर २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## उद्धव ठाकरेंच्या बेहिशेबी मालमत्तेची चौकशी सुरु

**दै.रायगड नगरी । मुंबई**

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि कुटुंबियांवरील बेहिशेबी मालमत्तेच्या आरोपांचं प्रकरणाची सुनावणी घेण्याचं हायकोर्टाकडून निश्चित झालं आहे. त्यानंतर मुंबई पोलिसांकडून चौकशीही सुरु करण्यात आली आहे. याबाबत राज्य सरकारने हार्यकोर्टात माहिती दिली आहे.



उद्धव ठाकरे कुटुंबीयांविरोधात सीबीआय व ईडीमार्फत तपास करण्याचा आदेश द्यावा, अशा विनंतीच्या गौरी भिडे यांनी फौजदारी जनहित याचिका केली आहे. 'ही याचिका केवळ गृहितकांवर आधारित आहे. शिवाय याचिकाकर्त्यांनी अन्य कायदेशीर मार्गांचाही अवलंब केलेला नाही. ठाकरे आता सत्तेत नसल्याने चौकशीवर प्रभाव टाकला जाण्याचा आरोपही होऊ शकत नाही', असा युक्तिवाद मांडून ही याचिका सुनावणीयोग्यच नसल्याचा आक्षेप ठाकरेंच्या वकिलांनी नोंदवला.

# कर्नाटक- महाराष्ट्र सीमावादाबाबत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री गप्प का? : दिलीप वळसे पाटील

## कामोठ्यात शरद पवारांच्या वाढदिवसानिमित्त महारांगोळीचे शानदार उद्घाटन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**कर्नाटक- महाराष्ट्र सीमाप्रश्नाबाबत केंद्र सरकारने ताबडतोब निर्णय घेतला पाहिजे. हे प्रकरण न्यायप्रविष्ठ असताना वेगळ्या प्रकारची आंतरिक भुमिका घेतली जाते. संबंधित राज्याला केंद्र सरकारने समज दिली पाहिजे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री याबाबत काही बोलत ना- हीत ही आश्चर्याची बाब आहे. कारण कर्नाटकचे मुख्यमंत्री आक्रमक भूमिका घेत असताना महाराष्ट्राच्या जनतेच्या वतीने सरकारने आपली भूमिका स्पष्टपणे मांडली पाहिजे. टीव्ही चॅनलवर बोलत असताना आम्ही तुम्हाला मुंबईतून काही करू अशी धमकी दिली असल्यामुळे त्यावर ताबडतोब कारवाई केली पाहिजे. नागरिकांच्या जीवाला धोका असेल तर त्यांना सुरक्षा देणे ही सरकारची जबाबदारी असल्याची प्रतिक्रिया माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी व्यक्त केली.**



कामोठे येथे माजी आमदार दत्तूशेठ पाटील इंटरनॅशनल स्कुलमध्ये शरद पवार यांच्या ८२ व्या वाढदिवसानिमित्त रयत शिक्षण संस्था रायगड विभागाचे चेअरमन आमदार बाळाराम पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित कृतज्ञता सप्ताहनिमित्त ४० हजार स्क्वेअर फुटी महारांगोळीचे उद्घाटन माजी गृहमंत्री तथा रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य दिलीप वळसे पाटील यांच्याहस्ते करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार बाळाराम पाटील, जे एम म्हात्रे, काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस सुदाम पाटील, प्रदेश चिटणीस सूरदास गोवारी, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, माजी सभापती काशिनाथ पाटील, रयत शिक्षण संस्था सातारा ऑडिटर डॉ. शिवलिंग मेनकुदळे, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य डॉ. गणेश ठाकूर यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते.

दिलीप वळसे पाटील पुढे म्हणाले, कर्नाटक- महाराष्ट्र असू दे, समाजा समाजामधील अंतर असू दे किंवा जातींमधील दुरी असू दे, असे विविध प्रश्न असताना छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांच्या काळात सगळ्यांना बरोबर घेऊन जाण्याचे काम केले. त्याच छत्रपतींचा विचार आता शरद पवार शाहु, फुले, आंबेडकरांच्या नंतर शांतपणे राबवण्याचा आणि समाजापर्यंत घेऊन जाण्याचे काम करत आहेत. म्हणून शरद पवार यांच्याबद्दल महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील जनतेच्या मनात आदर आणि प्रेम आहे.

> शरद पवारांनी समाजाला खूप काही दिले आहे. त्या बदल्यात आपण त्यांना काय देऊ हे माहीत नाही. आपल्या सगळ्यांच्या वतीने मी त्यांना शुभेच्छा देतो. त्यांना उत्तम प्रकृती आणि दीर्घायुष्य लाभो अशी परमेश्वराकडे प्रार्थना करतो. आणि आपल्या रयत शिक्षण संस्थेला त्यांचे अधिकाधिक मार्गदर्शन लाभो अशी सदिच्छा व्यक्त करतो. रामशेठ ठाकूर यांचे रयतच्या कार्यक्रमांना नेहमीच पाठबळ लाभते. त्यांचा हात नेहमीच वाहताच असतो. त्यांच्या सहकार्यबद्दल बोलण्यासाठी शब्द कमी पडतील.
>
> **दिलीप वळसे पाटील**

रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष पद्मविभूषण डॉ. शरद पवार यांच्या ८२ व्या वाढदिवसानिमित्त कृतज्ञता सप्ताहनिमित्त आज महारांगोळीचे उद्घाटन माजी आमदार दत्तूशेठ पाटील इंटरनॅशनल स्कूल कामोठे येथे करण्यात आले होते. तर प.जो.म्हात्रे विद्यालय व आ.धों.म्हात्रे ज्युनिअर कॉलेज, आय टी आय नावडे येथे भव्य खुल्या गटातील रांगोळी स्पर्धा, चित्रकला व पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. शरद पवार यांचे रांगोळी पोर्ट्रेट रयत शिक्षण संस्थेतील कलाशिक्षक मंगेश खुटारकर, रमेश खुटारकर व चेतन भोईर यांनी दिवसरात्र मेहनत घेऊन उत्तम पद्धतीने रेखाटले आहे. या रांगोळीचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले.

## एटीएम कार्डची अदलाबदली करून नागरिकांची फसवणूक करणाऱ्या आरोपींना अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेलसह नवी मुंबई परीसरात एटीएम मध्ये जाणाऱ्या नागरीकांना बोलण्यात गुंतवून ठेवुन त्यांचे एटीएम अदलाबदली करून नागरीकांची रक्कम पळवून फसवणुक करण्याबाबतचे तकारीचे प्रमाण वाढले होते. या संदर्भात तळोजा पोलिसांनी या गुन्ह्यातील सराईत गुन्हेगारांना ताब्यात घेतल्याने त्यांच्या कडून मोठ्या प्रमाणात गुन्हे उघडकीस आले आहेत.



तळोजा पोलीस ठाणे येथे सन २०२२ मध्ये एटीएम कार्डची अदलाबदली केलेबाबत एकुण ३ गुन्हे दाखल असून सदर गुन्हयांच्या तपासादरम्यान नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात घडलेल्या गुन्हयांचा तपशिल संकलीत करून घटनास्थळांवरील सशयीतांचे सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करून गुन्हे करताना वापरलेल्या वाहनाचे प्रकार, गुन्ह्यांचे ठिकाण, वेळ व वार, आरोपीतांचे वर्णन यांचे तपशिलवार वर्गीकरण करून अभ्यासपूर्ण व कौशल्यपूर्ण तांत्रिक तपास करून अशा प्रकारचे गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांची माहिती प्राप्त केली. एटीएम कार्ड बदली करून फसवणुक करणा-या सराईत गुन्हेगार यांचा कसोशीने मार्ग काढत असताना मिळालेल्या गोपनिय बातमीच्या आधारे ०३ डिसेंबर २०२२ रोजी तळोजा पोलीस ठाणे हद्दीत गुन्हा करण्याच्या तयारीत बाहेर पडलेल्या एका ऑटो रिक्षाचा पाठलाग करून त्यांना थांबवुन त्यामध्ये बसलेल्या ०३ संशयीत इसतमांना ताब्यात घेतले. संशयितांचे चौकशीदरम्यान त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिल्याने संशय वाढला.

आरोपीची कसून तपासणी केली असता आरोपी गणेश लोंडते (वय २४ उल्हासनगर), अजय यादव (वय २५ उल्हासनगर) व विकी पिल्ले (वय २८ अंबरनाथ) यांना ताब्यात घेऊन त्यांच्या कडून वेगवेगळया बँकांचे ९७ एटीएम कार्ड मिळुन आले तसेच त्यांनी अलिकडील काळात एटीएम बदली करून फसवणुक गुन्हे केले असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना तळोजा पोलीस ठाणे, भादवि कलम ४२०, ४०६,३४ या गुन्हयामध्ये अटक करण्यात आली आहे. आरोपींना अटक करताना आरोपींच्या अंग झडतीमध्ये वेगवेगळ्या बँकांचे ९७ एटीएम कार्ड्स मिळून आल्याने आरोपींची पोलीस कोठडी रिमांड घेवुन चौकशी केली असता त्यांनी या पुर्वी नवी मुंबई, ठाणे, रायगड, पुणे रत्नागिरी व लातुर हद्दीत गुन्हे केल्याची कबुली दिली आहे.

## पेण,अलिबाग आणि नागोठणे औद्योगिक वसाहतीच्या भागातील रस्त्यांच्या कामास शासनाकडून मंजूरी

## जिल्ह्यामध्ये अधिकाधिक गुंतवणुकीसाठी शासन कटिबद्ध : पालकमंत्री उदय सामंत

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने पेण, अलिबाग आणि नागोठणे औद्योगिक वसाहतीच्या भागातील २६ किलोमीटर रस्त्यांच्या कामासाठी सुमारे १७ कोटींच्या निधीस मंजूरी मिळाली असल्याची माहिती पालकमंत्री उदय सामंत यांनी आज येथे दिली.

श्री.सामंत म्हणाले, जिल्ह्यामध्ये अधिकाधिक गुंतवणूक येण्यास्तव शासन कटिबद्ध असून या भागातील पायाभूत सुविधांसाठी भरघोस निधी उपलब्ध करून दिला जात आहे. उद्योगांच्या माध्यमातून स्थानिकांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळणार आहेत. पेण, अलिबाग आणि नागोठणे औद्योगिक वसाहतीच्या भागातील ही रस्त्याची कामे एमआयडीसी'च्या माध्यमातून करण्यात येणार आहेत, असे राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांनी जाहीर केले आहे .



## पनवेल महानगरपालिकेच्या स्वच्छता स्पर्धांना विद्यार्थ्यांचा व नागरिकांचा मोठा प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महापालिकेच्यावतीने स्वच्छ भारत अभियानांतर्गत नुकत्याच(८डिसेंबर)' स्वच्छता स्पर्धा' आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहांमध्ये घेण्यात आल्या. आयुक्त श्री.गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या स्पर्धांना पनवेल महापालिका क्षेत्रातील नागरिक तसेच शालेय विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद लाभला. यावेळी जिंगल स्पर्धा, शॉर्ट फिल्म,पथनाट्य स्पर्धा, चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या.



यावेळी उपायुक्त सचिन पवार, सहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते, आरोग्य विभाग प्रमुख अनिल कोकरे तसेच या स्पर्धेचे परिक्षण करण्याकरिता प्रसिध्द अभिनेते निर्माते, दिग्दर्शक प्रदिप गोगटे, अभिनेते विजय पवार, चित्रकला शिक्षक मोहम्मद शेख, चित्रकला शिक्षक किर्तीराज साबणे उपस्थित होते.

स्वच्छ भारत अभियानाची पनवेल महानगरपालिका हद्दीमध्य प्रभावीपणे अंमलबजावणी सुरू आहे. स्वच्छ भारत अभियानामध्ये पनवेल महानगरपालिका हद्दीतील नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढविण्यासाठी तसेच स्वच्छतेच्या बाबतीत जनजागृती होण्याकरिता महानगरपालिकेकडून विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. त्या अनुषंगाने नागरिकांच्यामधील कला गुणांना वाव देण्याकरिता स्वच्छता स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

जिंगल स्पर्धेमध्ये विविध शाळांच्या विद्यार्थ्यांनी तसेच नागरिकांनी मोठा सहभाग नोंदवला. यामध्ये सिंगल युज प्लास्टिक, होम कंपोस्टींग अशा विषयांवरतीच्या जिंगल सुंदररित्या रचून त्याला संगीताच्या साथीने उत्तमप्रकारे सादरीकरण स्पर्धकांनी केले. तसेच विविध विद्यार्थी तसेच नागरिकांनी सिंगल युज प्लास्टिक, होम कंपोस्टींग, ३ आर हे विषय घेऊन सखोल माहितीसह वैशिष्ट्य पूर्ण अशा शॉर्ट फिल्म तयार केल्या होत्या. स्पर्धकांचा खरा उत्साह पथनाट्य स्पर्धेमध्ये पहायला मिळाला. शाळांच्या विद्यार्थ्यांनी तसेच नागरिकांनी वेगवेगळ्या प्रापर्टीज तसेच क्लॅप बॉक्स यांचा खुबीने वापर करत पथनाट्य सादर केलेत. आपल्या जगण्यातील रोजच्या व्यवहारातील उदाहरणे घेऊन प्लास्टिकचे होणारे तोटे, कचऱ्याचे वर्गीकरण, कंपोस्ट खत तयार करणे अशा प्रसंगाचे सादरीकरण उत्तम प्रकारे केले. सर्वच स्पर्धकांनी चुरशीने आपआपले सादरीकरण केले. यानंतर परिक्षकांनी भिंतीचित्रांचे परिक्षण केले. इयत्ता १ ली ते महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी दिलेल्या विषयांवरची सुंदर चित्रे रेखाटली होती. येत्या काही दिवसांनंतर भव्य दिव्य कार्यक्रमामध्ये या स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण करण्यात येणार आहे.

> जिंगल स्पर्धेत १२, पोस्टर स्पर्धेत ५८, शॉर्ट फिल्म ११,पथनाट्य ९, भिंती चित्रे ३ अशा प्रवेशिका आल्या होत्या. या सर्व स्पर्धांसाठी 'सिंगल युज प्लास्टिक बंदी', 'होम कंपोस्टींग', 'हवेची गणवत्ता सुधारणा', '३ आर( रिड्युस, रियुज, रिसायकल) चे महत्व', 'कचऱ्याचे चार प्रकारांमध्ये वर्गीकरण करणे' असे विषय देण्यात आले होते.

### पनवेल शहर जिल्हा युवक काँग्रेसच्या वतीने....

## पनवेल अर्बन बँकेच्या निवडणुकीत विजयी उमदेवार व नवनिर्वाचित तालुकाध्यक्ष यांचा सत्कार समारंभ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहर जिल्हा युवक काँग्रेसच्या वतीने नुकताच पार पडलेल्या दि. पनवेल को. ऑप. अर्बन बँक लि. निवडणुकीत काँग्रेस पक्षामधून विजयी उमेदवार अरविंद सावळेकर, जनार्दन पाटील, सौ. विमल मल्लिनाथ गायकवाड व पनवेल तालुक्याचे नवनिर्वाचित अध्यक्ष म्हणून नंदराज मुंगाजी यांची नियुक्ती झाली म्हणून यांचा सत्कार समारंभाचा कार्यक्रम काँग्रेस भवन पनवेल येथे घेण्यात आला.



तसेच पनवेल शहर युवक काँग्रेस प्रभारी अध्यक्ष पदी संदेश ठाणगे व नवीन पनवेल युवक काँग्रेस उपाध्यक्ष पदी गोविंद लोंढे यांची नेमणूक करून नियुक्ती पत्र देण्यात आले तसेच कार्यक्रमास मार्गदर्शन पनवेल शहर जिल्हा अध्यक्ष अभिजित पांडुरंग पाटील, काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते डॉ. भक्तीकुमार दवे, पनवेल तालुका अध्यक्ष नंदराज मुंगाजी, काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते शशिकांत बांदोडकर, अर्बन बँकचे संचालक अरविंद सावळेकर, अर्बन बँकचे संचालक जनार्दन पाटील, पनवेल शहर जिल्हा सरचिटणीस मल्लिनाथ गायकवाड, प्रवीण कांबळे, पनवेल शहर जिल्हा महिला अध्यक्षा निर्मला म्हात्रे व पनवेल शहर जिल्हा युवक अध्यक्ष हेमराज नाथा म्हात्रे यांनी केले.

सदर कार्यक्रमा प्रसंगी रायगड जिल्हा परिषदचे माजी अध्यक्ष अनंत सुदाम पाटील, जेष्ठ नेते अशोक खेर, पनवेल शहर ब्लॉक अध्यक्ष लतीफ शेख, पर्यावरण सेलचे अध्यक्ष सुरेश पाटील, सहकार सेलचे अध्यक्ष अरुण कुंभार, खारघर अध्यक्ष विश्वनाथ चौधरी, पनवेल तालुका महिला अध्यक्षा योगिता नाईक, महाराष्ट्र प्रदेश युवक सचिव विश्वजित पाटील, प्रीतेश शाहू, नवीन पनवेल अध्यक्ष राहुल जानोरकर, खांदा कॉलनी अध्यक्ष जयवंत देशमुख, तळोजा अध्यक्ष बबन केणी, सुधीर मोरे, कान्हा कडव, लतीफ नालखंडे, रेमंड गोवियस, आदम ढलाईत, जॉस जोसेफ, कांतिभाई गंगर, आरती ठाकूर, नीता शेणोय, मर्फी म्हसकर, शाहीद मुल्ला तसेच पनवेल शहर जिल्हा महिला काँग्रेस, युवक काँग्रेस, सर्व सेलचे अध्यक्ष, पदाधिकारी व कार्यकर्ते या कार्यक्रमास उपस्थित होते.

## संजय राऊतांच्या अडचणीत वाढ ; पुन्हा चौकशी होणार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबईतील १ हजार ०३४ कोटींच्या पत्राचाळ पुनर्विकासात झालेल्या आर्थिक घोटाळ्याप्रकरणी शिवसेना नेते आणि खासदार संजय राऊत यांचा विशेष पीएमएलए न्यायालयाने जामीन मंजूर करण्यात आला. अखेर १०० दिवसांनी संजय राऊत आर्थर रोड तुरुंगातून बाहेर आले. यानंतर आता या प्रकरणात आरोप निश्चितीची प्रक्रिया सुरु झाली असून, याची प्राथमिक सुनावणी शुक्रवारी घेण्यात आली. या सुनावणीवेळी संजय राऊत न्यायालयात हजर होते. न्या. आर. एन. रोकडे यांच्या न्यायालयात पत्रा- चाळ पुनर्विकास आर्थिक गैरव्यवहार प्रकरणाची सुनावणी घेण्यात आली. यावेळी संजय राऊत, प्रवीण राऊत यांच्यासह पाच आरोपी न्यायालयात हजर झाले. जामिन मिळाल्यानंतर संजय राऊत यांनी न्यायालयासमोर हजर राहण्याची ही पहिलीच वेळ होती. गोरेगाव येथील पत्राचाळ पुनर्विकासाप्रकरणी प्रवीण राऊत यांनी या जागेचा एफएसआय परस्पर विकला. यात सुमारे ०१ हजार कोटी रुपयांचा व्यवहार होता, असा आरोप करण्यात आला आहे.

# फास आणि श्वास

भारतात प्लास्टिकबंदीचा विषय किती अवघड, बहुपदरी आणि यंत्रणांना हाताळण्यास अवघड आहे; हे महाराष्ट्र सरकारच्या ताज्या निर्णयावरून लक्षात येते. १६ सप्टेंबर २०१४ पासून महाराष्ट्र सरकारने एक-दोनदा नव्हे पाच वेळा प्लास्टिक बंदीची अधिसूचना काढली. यातली शेवटची अधिसूचना एक जुलै, २०२२ रोजी निघाली; तेव्हाही राज्य सरकारने 'आता मात्र प्लास्टिक बंदीची अंमलबजावणी कठोरपणे आणि राज्यात सर्वत्र होईलच,' असा निर्धार व्यक्त केला. जुलै ते नोव्हेंबर या पाच महिन्यांत हा निर्धार कितपत अमलात आला, हे दिसते आहेच. परवा एक डिसेंबरला हा निर्णय पुन्हा फिरविण्यात आला. मात्र, मूळ पर्यावरणप्रेमी धोरणापासून सरकार दूर गेलेले नाही, हे दाखवून देण्यासाठी वापरात येणारे प्लास्टिक विघटनशील कसे असावे आणि त्याच्या वापराची अनुमती कशी केंद्रीय संस्थेकडून घेणे आवश्यक आहे, असे सरकारी परिपत्रक निघाले. सरकारने पर्यावरण रक्षणाच्या बाजूने हा निर्णय मुळीच घेतलेला नाही. त्याचे कसनुसे समर्थन सरकार करते आहे. मात्र, प्लास्टिक बंदीचा विषय हा सागराच्या तळाशी, नद्यांच्या मुखांशी, विक्राळ कचरा डेपोंमध्ये आणि गायीगुरांच्या पोटात जितकी गुंतागुंत निर्माण करतो; तितकाच गुंतागुंतीचा आहे. त्यात जसे अर्थकारण गुंतले आहे; त्याचप्रमाणे समाजाची सवय हाही यातला महत्त्वाचा मुद्दा आहे. 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स' तसेच लघू उद्योजकांच्या संघटनांच्या आग्रहाला विनंती देऊन राज्य सरकारने ६० जीएसएमपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक वस्तूंच्या वापराला परवानगी दिली आहे. जीएसएम म्हणजे 'ग्रॅम पर स्क्वेअर मीटर'. याचा अर्थ एक चौरस मीटर प्लास्टिकच्या तावाचे वजन साठ ग्रॅमपेक्षा कमी असेल तर बंदी आणि जास्त असेल तर परवानगी, असे ते सूत्र होते. ते पुन्हा गेले आहे. जितके जीएसएम जास्त तितके ते प्लास्टिक महाग होते आणि त्याच्या निर्मितीची प्रक्रियाही बदलते. तसेच, त्याची वाहतूक, त्याचे पॅकिंग आणि त्याच्या चमचा, ग्लाससारख्या वस्तू हेही सारे महाग होत जाते. या साऱ्यांचा अखेरचा बोजा ग्राहकावर पडतो आणि त्याने पाठ फिरवली तर प्लास्टिकशी निगडीत असे सारे अर्थचक्रच बिघडून जाते. महाराष्ट्र हा दिल्लीच्या खालोखाल प्लास्टिकचा वापर करणारा प्रांत आहे. प्लास्टिकशी निगडीत असे राज्यात हजारो रोजगार आहेत. या साऱ्याला गेल्या पाच महिन्यात बसलेला फटका छोट्या-मोठ्या उद्योगांना जाणवतच होता. त्यातूनच, त्यांची चिंता वाढत होती. ती आता सरकारने ऐकली आहे. आता वापरात येणारे प्लास्टिक हे विघटनशील असावे आणि त्याच्या उत्पादनासाठी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ तसेच 'सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ प्लास्टिक इंजिनीअरींग अँड टेक्नॉलॉजी' यांच्याकडून रीतसर अनुमती घेतलेली असावी, असेही महाराष्ट्र सरकारने म्हटले आहे. ही नव्या निर्णयाची तांत्रिक बाजू झाली. प्रत्यक्षात काय होईल आणि कुठले नियम किती पाळले जातील, हा प्रश्न आहेच. कमी प्रतीचे व जाडीचे प्लास्टिक चालवून घेणाऱ्या सरकारी यंत्रणा आणि बंदीची भीती घालून दमदाटीने पैसे उकळणाऱ्या यंत्रणा या दोन्हींचा साऱ्या उद्योगांना आणि ग्राहकांना त्रासच होता. तो आता कमी होईल. मात्र, मूळ समस्या त्याने सुटणार नाही. समाजाच्या दैनंदिन जीवनातील प्लास्टिकचा वापर असा बंदीची वॉशिंग्टनची कुऱ्हाड चालवून संपणार किंवा थांबणार नाही. त्यासाठी, अनेक पातळीवर या प्रश्नाला मुळापासूनच भिडावे लागणार आहे. तशी तयारी आज ना सरकारची आहे, ना समाजाची. त्यामुळेच, बंदी घालणे आणि बंदी उठवणे, हा खेळ महाराष्ट्राने गेल्या आठ वर्षांमध्ये सहा वेळा अनुभवला आहे. प्लास्टिक हे काच, लाकूड, स्टील, ॲल्युमिनियम, कातडे, कापड, कागद, रबर, पुठ्ठा.. अशा असंख्य पदार्थांना हटवून तेथे स्वत:चा स्वस्त, हलका आणि टिकाऊ पर्याय देते. तो पर्याय काढायचा तर एखाद्या महायुद्धाची करावी, तशी तयारी सर्व पातळीवर होण्याची गरज असते. केंद्रीय मंत्र्यांच्या कार्यक्रमांमध्ये टेबलावर व सभागृहात पाण्याच्या प्लास्टिकच्या बाटल्या दिसत असतील तर जाणीव जागृतीचा किती मोठा पल्ला अजून बाकी आहे; याची केवळ कल्पनाच केलेली बरी. जिथे जिथे प्लास्टिक तिथे तिथे तितकाच टिकाऊ पण स्वस्त पर्याय, हे वैज्ञानिक, कल्पक उद्योजक, सरकार आणि समाज या साऱ्यांपुढचे भीमकाय आव्हान आहे. ते पेलण्याची तयारी न करता नुसतेच हुकूमनामे निघाले की ते काही दिवसांत निष्प्रभ तरी ठरणार किंवा मागे तरी घ्यावे लागणार. तसेच, आताही झाले आहे. प्लास्टिकचा फास पृथ्वीचा श्वास घोटतो आहे; हे विधान उच्चभ्रू चर्चासत्रांमध्ये शोभून दिसते. प्रत्यक्षात, प्लास्टिकवरची बंदी छोट्या उद्योगांचा व रोजगाराचा श्वास कोंडीत पकडत असते. याचा अर्थ, प्लास्टिकमुक्ती नको, असा नाही. मात्र, ती चौफेर विचार करून, ठोस पावले टाकून आणि अर्थकारणाची गती मंदावू न देता अमलात यायला हवी. पायापुरता विचार करून ते पेलता येणारेही नाही.

# लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडीयम स्कुल व ज्युनिअर कॉलेजमध्ये 'रयत विज्ञान भव्य प्रदर्शन'



**दै.रायगड नगरी । पनवेल**

रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून विविध उपक्रमे आयोजित करण्यात आली आहेत. त्या अनुषंगाने आज (दि. ०८) कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडीयम स्कुल व ज्युनिअर कॉलेजमध्ये सशक्त भारत, सदृढ भारत, सक्षम भारत या शिर्षकाखाली 'रयत विज्ञान भव्य प्रदर्शन' आयोजित करण्यात आले होते. रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या प्रदर्शनाचे उद्घाटन वैज्ञानिक तथा स्पेस सायन्स रिर्सचर प्रज्ञेश लक्ष्मण म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून स्थानिक स्कुल कमिटीचे चेअरमन आमदार प्रशांत ठाकूर, रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष पी. जे. पाटील, सहसचिव राजेंद्र साळुंखे, माजी सचिव डॉ. गणेश ठाकूर, पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत, वाय. टी. देशमुख, जे. एम. म्हात्रे, महेंद्र घरत, शैलेश म्हात्रे, सुधिर घरत, रायगड विभागाचे सहाय्यक विभागीय अधिकारी एस.एस.फडतरे, रोहिदास ठाकूर, भाजपचे कामोठे शहर अध्यक्ष रवि जोशी, युवानेते हॅप्पी सिंग, आर. पी.म्हात्रे, सर्वेश म्हात्रे, विभागीय पीअ-रओ बाळासाहेब कारंडे, मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे व अर्चना चव्हाण, संतोष गुजर, यांच्यासह पदाधिकारी, विविध विद्यालयांचे प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांचा १२ डिसेंबर रोजी ८२ वा जन्मदिवस साजरा करण्यात येणार आहे. दुग्ध शर्करा योग म्हणजे रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सभासदत्व अध्यक्ष शरद पवार यांना प्राप्त झाल्याचे पन्नास वर्षे पूर्ण होत आहेत. रयत शिक्षण संस्थेचा वटवृक्ष फोफावण्यामध्ये त्यांचे अनन्यसाधारण योगदान आहे. त्या अनुषंगाने रयत शिक्षण संस्थेच्या पाचही विभागांच्या वतीने जन्म दिनाच्या औचित्याने 'कृतज्ञता सप्ताह' साजरा करण्यात येत आहे.

रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांचा वाढदिवस १२ डिसेंबर रोजी असून या वर्षी त्यांच्या संस्थेच्या जनरल बॉडी सभासदत्त्वासही वर्षे पूर्ण होत आहेत. संस्थेसाठी त्यांचे योगदान खूप मोठे व अनन्यसाधारण असे आहे. त्यामुळे त्यांचा वाढदिवस प्रत्येक शाखेत विविध उपक्रमांनी साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. दानशूर लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या रायगड विभागातील संस्थेचे पदाधिकारी, जनरल बॉडी सदस्य, लाईफ मेंबर, लाईफ वर्कर, प्राचार्य, मुख्याध्यापक, शाळांचे चेअरमन व स्कूल कमिटी जेष्ठ सदस्य, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक यांच्या बैठकीत दिनांक ०६ ते १२ डिसेंबर पर्यंत रायगड विभागीय स्तरावरील 'कृतज्ञता सप्ताह' आयोजित करण्याचे एकमताने ठरले होते. त्यानुसार रायगड विभागीय स्तरावरील 'कृतज्ञता सप्ताह' मध्ये वक्तृत्त्वस्पर्धा, निबंधस्पर्धा, चित्रकला,/ पोस्टर्स स्पर्धा, रांगोळीस्पर्धा, क्रीडास्पर्धा, महारांगोळी, सांस्कृतिक कार्यक्रम स्पर्धा, विज्ञान प्रदर्शन, हाफ मॅरेथॉन आदी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. त्या अनुषंगाने आज भव्य विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनात रायगड विभागातील विविध विद्यालयांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

# नवी मुंबईत सर्वसुविधायुक्त महसूल भवन उभारणार : ना.राधाकृष्ण विखे पाटील

## कोकण विभागीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेचा मुंबई, चेंबूर येथे शुभारंभ

**दै.रायगड नगरी । मुंबई**

महसूल विभाग हा प्रशासनाचा कणा असून हा विभाग अधिक सक्षम करण्यासाठी येत्या काळात प्रयत्न सुरु आहेत. याचदृष्टीने महसूल विभागासाठी महत्त्वपूर्ण आणि आवश्यक असे सर्वसुविधायुक्त भव्य महसूल भवन नवी मुंबईत उभारण्यात येणार असल्याची घोषणा राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे- पाटील यांनी केली.

कोकण विभागीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन ९ ते ११ डिसेंबर दरम्यान चेंबूर येथील राष्ट्रीय केमिकल फर्टीलायझर मैदान येथे आयोजित करण्यात आले आहे. या स्पर्धांचे उद्घाटन आज सकाळी महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कोकण विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर, कोकण विभागाचे अपर आयुक्त किशन जावळे, मुंबई उपनगर जिल्हाधिकारी निधी चौधरी, मुंबई जिल्हाधिकारी राजीव निवतकर, ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, पालघर जिल्हाधिकारी गोविंद बोडके, राष्ट्रीय केमिकल फर्टीलायझरचे कार्यकारी संचालक अनिल माथूर, बार्कचे मुख्य वास्तुविशारद श्री.नागराज, पोलिस उपायुक्त अजय बन्सल यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

महसूल विभाग गतीमान करताना आपल्या अधिकारी आणि कर्मचारी यांना चांगल्या सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याला प्राधान्य असणार आहे. महसूल विभागासाठी महत्त्वपूर्ण आणि आवश्यक असे सर्वसुविधायुक्त महसूल भवन नवी मुंबईत उभारण्यात येणार असून यासंदर्भातील बैठक पुढील आठवड्यात नवी मुंबईत घेण्यात येईल, असे महसूल मंत्री श्री. विखे पाटील यांनी सांगितले.

तसेच महसूल विभागासाठी येणाऱ्या काळात याबाबत त्या उपाययोजनांचा अभ्यास करुन त्याबाबतची अंमलबजावणी करण्यात येईल. कोरोना काळात महसूल विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी यांनी आरोग्य यंत्रणेसोबत काम करून सामान्य जन-तेला दिलासा देण्याचे मोठे काम केले, असेही मंत्री श्री. विखे पाटील यांनी सांगितले.

कोविड महामारीमुळे महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा आयोजित करण्यात आल्या नव्हत्या. आता दोन वर्षांनी क्रीडा आणि सांस्कृतिक स्पर्धा आयोजन केल्याने अधिकारी कर्मचाऱ्यांना आपले कला गुण दाखवण्याची संधी मिळाली. या स्पर्धांमुळे पुन्हा नव्याने चांगले काम करण्याची ऊर्जा मिळेल, असेही महसूलमंत्री श्री. विखे पाटील यांनी यावेळी सांगितले.

विभागीय आयुक्त डॉ. कल्याणकर यांनी तीन दिवसीय स्पर्धेमध्ये कोकण विभागातून जवळपास १६०० अधिकारी आणि कर्मचारी सामील झाले असल्याचे सांगितले. मुंबई उपनगर जिल्हाधिकारी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविकात खेळ संस्कृती रुजावी यासाठी दरवर्षी अशा स्पर्धा आयोजित करण्यात येत असल्याचे सांगितले.

कोकण विभागीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेचा शुभारंभ महसूलमंत्री श्री. विखे पाटील यांच्याहस्ते ध्वजारोहण करून तसेच क्रीडा ज्योत पेटवून करण्यात आला. यावेळी क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात भाग घेणाऱ्यांना निरोगी खेळ खेळण्यासाठीची शपथ देण्यात आली. कोकण विभागाच्या मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, आणि सिंधुदूर्ग अशा सात जिल्ह्याच्या क्रीडा पथकांनी यावेळी संचालन केले. या क्रीडा संचलनात पालघर जिल्ह्याला तृतीय, रायगड जिल्ह्याला द्वितीय आणि मुंबई उपनगर जिल्ह्याला प्रथम पुरस्कार मिळाला. तसेच यानंतर पार पडलेल्या १०० मीटर स्पर्धेतील विजेत्या पुरूष व महिला खेळाडूंना प्रशस्तीपत्र व पदक देऊन क्रीडा मंत्री यांच्या हस्ते गौरविण्यात आले. शुभारंभावेळी सांस्कृतिक फाऊंडेशनने सादर केलेल्या आय लव मुंबई या संकल्पनेवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रमाने सर्वांचे लक्ष वेधले.

# साळाव परिसरात बिबट्याचा हल्ल्यापासून बचावासाठी वनविभागातर्फे जनजागृती



**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील साळाव परीसरात गेल्या दहा पंधरा दिवसांपासून बिबट्याचा वावर असून येथील बिबट्याचा हल्लयात कृष्णा पाटील यांच्या वाड्यातील म्हशीच्या दोन पारड्यांचा मृत्यू झाल्याची घटना नुकतीच घडली होती.यावर उपाययोजना करण्याची मागणी ग्रामस्थ व ग्रामपंचायतीमार्फत वनविभागाला करण्यात आली होती.याची रोहा वनविभागाचे उपवनसंरक्षक निकत सर व मुरुड वनपरिक्षेत्र अधिकारी मनोज वाघमारे यांनी तातडीने दखल घेऊन साळाव परीसरात जनजागृती करण्यात आली आली

दहा पंधरा दिवसांपासून या परिसरात बिबट्याचा वावर असल्याने दहशतीचे व भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.बिबट्या वन्यप्राण्यांपासून खबरदारी व संरक्षण कसे करावे. या बाबतीत रोहा वनविभागाचे उपवनसंरक्षक निकत यांचे मार्गदर्शनाखाली मुरुड वनपरिक्षेत्र अधिकारी मनोज वाघमारे तसेच वनपाल वैभव शिंदे (बोर्ली), वनरक्षक पंढरिनाथ दिघे, भगवान पिंगळे, पृथ्वीराज चव्हाण,एन.जी.ओ.कृणाल साळुंखे यांनी साळाव व परीसरातील गावात जाऊन लोकांना मार्गदर्शनपर माहिती देऊन बिबट्या व वन्यप्राण्यांपासून खबरदारी व संरक्षण कसे करावे या बाबतीत सविस्तर माहिती देऊन जनजागृती केली

# रोह्यात ११ डिसे.रोजी जागतिक अपंग दिनानिमित्त कर्णबधिर अपंग शिबीर

**दै.रायगड नगरी । धाटाव**

रोह्यात जागतिक अपंग दिनानिमीत्त युवक प्रतिष्ठान आणि हेल्पर्स ऑफ दि हॅण्डिकॅप् यांच्या संयुक्त विद्यमाने कर्णबधिर अपंग शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.ज्या व्यक्तींना कमी ऐकायला येत आहे किंवा त्रास होत आहे अशा रुग्णांची याठिकाणी तपासणी केली जाणार आहे.

रोह्यातिल सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासकीय विश्रागृहात रविवार दि.११ डिसे. रोजी सकाळी १०:३० पासून सायंकाळी ३:०० वाजेपर्यंत होणाऱ्या या शिबिरासाठी भाजपाचे नेते, खासदार किरीटजी सोमय्या यांच्यासमवेत मुलुंड (निलमनगर)चे नगरसेवक नील किरीट सोमय्या, आखिल भारतीय पत्रकार परिषदेचे कार्याध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, सिटिझन फोरमचे निमंत्रक प्रदीप (आप्पा) देशमुख, शिंदे गट शिवसेना तालुकाप्रमुख, ॲड.मनोजकुमार शिंदे, रोहा सिटिझन फोरमचे अध्यक्ष नितीन परब, भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ कार्यकर्ते तानाजी(आप्पा)देशमुख, हेल्पर्स ऑफ दि इण्डिकैप्ड संस्थेचे अध्यक्ष प्रमोद (पी.डी) देशपांडे, यांसह इतर मान्यवर उपस्थित रा-हणार आहेत.

पिंगळसई गावच्या सामाजिक कार्यकर्त्या,हेल्पर्स ऑफ दि हॅण्डिकॅप्ट संस्थेच्या रायगड प्रकल्प प्रमुख रोशन अमोल देशमुख यांसह सहकारी वर्गाने हे शिबिर आयोजित केले असून देशमुख यांना त्यांच्या सामाजिक कार्याची दखल म्हणून नुकतेच कोल्हापूर येथे सन्मानित करण्यात आले आहे.सातत्याने गावोगावी, विविध ठिकाणी शिबिरासाठी त्यांना त्यांच्या सहकारी वर्गाची चांगली साथ मिळत आहे. आयोजित कार्यक्रमात १० वी व १२ वी उत्तीर्ण अपंग मुलं, मुलींचा त्यांच्या वतीने सत्कार करण्यात येणार आहे.तर शिबिरात कर्णबधिर रुग्णांची तपासणी झाल्यानंतर त्या रुग्णाला गरज भासल्यास सवलतीच्या दरात कानाच्या मशिंनचेही वाटप करण्यात येणार आहे.

तरी आयोजित शिबिरात जास्तीत जास्त रुग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन हेल्पर्स ऑफ दि हॅण्डिकॅप्ट संस्थेच्या रायगड प्रकल्प प्रमुख रोशन अमोल देशमुख यांनी केले आहे.

# लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या जयंती निमित्त रोजगाराची सुवर्ण संधी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या जयंती निमित्त. जय गोपीनाथ प्रतिष्ठान व SAGE फाउंडेशन यांच्या माध्यमातून सुशिक्षित बेरोजगारांना कायमस्वरूपी रोजगाराची सुवर्ण संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे

जय गोपीनाथ प्रतिष्ठानचे मार्गदर्शन बबनराव बारगजे यांच्या माध्यमातून व सेग फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने बँकिंग क्षेत्रात तरुण तरुणींना रोजगाराची सुवर्णसंधी रविवार दिनांक ११/१२/२०२२ रोजी सकाळी १०.०० ते ५.०० वाजेपर्यंत. स्थळ - स्वामी समर्थ सेवा केंद्र सेक्टर ४ कळंबोली. येथे आहे. यासाठी आवश्यकता कोणत्याही शाखेचा पदवीधर किंवा तिसऱ्या वर्षात शिकत असलेले , असलेल्या तरुण-तरुणी. वयोमर्यादा १९ते २५ यांनी बबन बारगजे-८८२८६१११९९, अमोल पालवे- ८६५२७४१०१६ सुभाष आंधळे - ८४२२९ ४१२१२, महेश बारगजे - ९६६४२५४५२९ यांच्याशी संपर्क साधावा.

या सुवर्णसंधीचा सर्व तरुण तरुणींनी लाभ घ्यावा असे आवाहन बबनराव बारगजे यांनी केले आहे . या मेळाव्याचे उद्घाटन कळंबोली शहर अध्यक्ष रवीनाथ पाटील यांच्या हस्ते होईल. ऑनलाइन प्रशिक्षण देऊन तीन महिन्यानंतर कायमस्वरूपी बँकेत नोकरी मिळेल याची हमी सेग फाउंडेशन यांच्यावतीने देण्यात आलेली आहे.

# प्राच्यविद्या संशोधनला साडेसात कोटी अनुदान

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मूर्ती ट्रस्ट या सुधा मूर्ती आणि नारायण मूर्ती यांच्या कौटुंबिक प्रतिष्ठानने भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेला संस्कृत आणि प्राकृत भाषेतील दुर्मिळ पुस्तके आणि हस्तलिखितांचे जतन आणि संशोधन करण्यासाठी साडेसात कोटी रुपयांचे अनुदान देण्याची घोषणा केली. या अनुदानामध्ये १८,००० चौरस फूट हेरिटेज शैलीची, २०० आसनक्षमता असलेली शैक्षणिक आणि संशोधन इमारत, व्याख्याने आयोजित करण्यासाठी एक अत्याधुनिक सभागृह आणि प्राचीन पुस्तके आणि हस्तलिखिते डिजीटाईज करण्यासाठी दृकश्राव्य स्टुडिओ असलेल्या मूर्ती सेंटर ऑफ इंडिक स्टडीजचे बांधकाम समाविष्ट आहे. सुधा मूर्ती यांच्या हस्ते या इमारतीचे भूमिपूजन पुणे येथे करण्यात आले.



नवीन उपक्रमाबद्दल बोलताना सुधा मूर्ती म्हणाल्या, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था ही १०५वर्षे जुनी संस्था आहे आणि भारताच्या सांस्कृतिक वारशाचा एक प्रमुख आधारस्तंभ आहे. या संस्थेने बौद्धिक शोधनिबंध आणि पुस्तकांची भरपूर निर्मिती केली आहे. भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेमधील प्रत्येक प्राध्यापक महान विद्वान आहेत. 'महाभारताची चिकित्सा आवृत्ती' आणि 'काणे यांचे धर्मशास्त्र' या दोन पुस्तकांच्या बौद्धिक कार्याने मी भारावून गेले. ही दोन्ही पुस्तके माझ्या मनाला खूप भावली आहेत. काळ बदलला तसे आता लोकांना आपल्या संस्कृती बद्दल अधिक जाणून घेण्यासाठी ऑनलाइन वर्ग हवे आहेत. या क्षेत्रातील जाणकारांशी संवाद साधायची इच्छा आहे. म्हणूनच मूर्ती ट्रस्टने भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेसाठी भारताचा सांस्कृतिक वारसा साजरा करण्यासाठी समर्पित असलेली एक नवीन आणि आधुनिक इमारत बांधून देण्याचे ठरवले आहे.

भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष भूपाल पटवर्धन यांनी देखील संस्थेच्या मूर्ती सेंटर ऑफ इंडिकस्टडीजच्या योजनांबद्दल सांगितले. सुधाताई यांनी शैक्षणिक प्रकल्पांसाठी निधी दिला आहे आणि आता संस्थेकडे भारतीयतत्त्व ज्ञान ते कथ्थक आणि आयुर्वेदापासून खगोलशास्त्रापर्यंत विविध विषयांवर काम करणारे अंदाजे ४० विद्वान आहेत. आगामी मूर्ती सेंटर ऑफ इंडिकस्टडीज ६० हून अधिक विद्वानांना सामावून घेऊ शकते. त्याचवेळी या संशोधन संस्थेने आता शिक्षण कार्यातही प्रवेश केला आहे. त्यामुळे, वर्गखोल्यांमध्ये विविध अभ्यासक्रमांसाठी २०० विद्यार्थ्यांना सामावून घेता येईल आणि या मूर्तीसेंटरमध्ये स्टुडिओ असल्याने आम्ही चांगला ऑनलाइन आशय तयार करू शकू आणि तो 'भारतविद्या' या आमच्या प्लॅटफॉर्मवर सादर केला जाईल. संस्थेकडे २८,००० हस्तलिखिते आणि जुनी पुस्तके आहेत. ही पुस्तके जतन करण्यासाठी नवीन इमारतीत एक संवर्धन प्रयोगशाळा असणार आहे. संस्थेसाठी आणि तिच्या भविष्यासाठीही एक मोठी झेप ठरणार आहे. या सुविधेमुळे भारतीय संस्कृतीतील् विविध विषयांचा प्रसार जगभर केला जाऊ शकतो. त्यामुळे आम्ही मूर्तीट्रस्टचे अत्यंत ऋणी आहोत,असेही त्यांनी म्हंटले.

**क्षमस्व:**

दै.रायगड नगरी या वृत्तपत्रात दि.८ डिसेंबर २०२२ रोजीच्या अंकात 'पोलादपूर तालुक्यात पुन्हा पोस्को गुन्हा' या मथळ्याखाली वृत्त प्रसिद्ध झाले होते. त्यात अनावधनाने क्रुरकृत्य ऐवजी कृष्णकृत्य असे प्रसिद्ध झाले होते. याबद्दल कोणाच्याही भावना दुखावल्या असतील तर त्याबाबत आम्ही दिलगिरी व्यक्त करीत आहोत.

: **संपादक**

# रायगड व पनवेल तालुका अंतर्गत येणारे युवकांच्या उज्ज्वल भविष्यासाठी पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण आयोजित करण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पोलीस दलातील कार्यरत पोलीस प्रशिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेलमध्ये १५ दिवसाच्या शिबिराचे नव युवकांच्या उज्ज्वल भविष्यासाठी पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण मोफत स्वरूपात आयोजित करावे अशी मागणी समाजसेवक पवन उत्तमराव काळे यानी पोलीस आयुकत यांच्याकडे केली आहे.

काही होतकरू व तरुण युवक पोलीस भरतीची तयारी करत आहेत. पण त्यांच्याकडे प्रायव्हेट प्रशिक्षण क्लासेस लावायला पुरेसा निधी नाही, त्यांचे पालक मध्यम व गोरगरीब वर्गातून आहे त्याकरिता त्या युवकांना मार्गदर्शन आणि प्रशिक्षणाची खूप गरज आहे.

त्यामुळे योग्य तो विचार करून योग्य तो निर्णय घ्यावा अशी मागणी पवन उत्तमराव काळे यानी केली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## रोह्यात ११ डिसे.रोजी जागतिक अपंग दिनानिमित्त कर्णबधिर अपंग शिबीर

**दै.रायगड नगरी । धाटाव**

रोह्यात जागतिक अपंग दिनानिमीत्त युवक प्रतिष्ठान आणि हेल्पर्स ऑफ दि हॅण्डिकॅप् यांच्या संयुक्त विद्यमाने कर्णबधिर अपंग शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.ज्या व्यक्तींना कमी ऐकायला येत आहे किंवा त्रास होत आहे अशा रुग्णांची याठिकाणी तपासणी केली जाणार आहे.

रोह्यातिल सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासकीय विश्रागृहात रविवार दि.११ डिसे.रोजी सकाळी १०:३० पासून सायंकाळी ३:०० वाजेपर्यंत होणाऱ्या या शिबिरासाठी भाजपाचे नेते, खासदार किरीटजी सोमय्या यांच्यासमवेत मुलुंड (निलमनगर) चे नगरसेवक नील किरीट सोमय्या, आखिल भारतीय पत्रकार परिषदेचे कार्याध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, सिटिझन फोरमचे निमंत्रक प्रदीप (आप्पा) देशमुख, शिंदे गट शिवसेना तालुकाप्रमुख, ॲड.मनोजकुमार शिंदे, रोहा सिटिझन फोरमचे अध्यक्ष नितीन परब, भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ कार्यकर्ते तानाजी (आप्पा) देशमुख, हेल्पर्स ऑफ दि इण्डिकैप्ड संस्थेचे अध्यक्ष प्रमोद (पी.डी) देशपांडे, यांसह इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

पिंगळसई गावच्या सामाजिक कार्यकर्त्या,हेल्पर्स ऑफ दि हॅण्डिकॅप्ट संस्थेच्या रायगड प्रकल्प प्रमुख रोशन अमोल देशमुख यांसह सहकारी वर्गाने हे शिबिर आयोजित केले असून देशमुख यांना त्यांच्या सामाजिक कार्याची दखल म्हणून नुकतेच कोल्हापूर येथे सन्मानित करण्यात आले आहे. सातत्याने गा-वोगावी, विविध ठिकाणी शिबिरासाठी त्यांना त्यांच्या सहकारी वर्गाची चांगली साथ मिळत आहे. आयोजित कार्यक्रमात १० वी व १२ वी उत्तीर्ण अपंग मुलं,मुलींचा त्यांच्या वतीने सत्कार करण्यात येणार आहे.तर शिबिरात कर्णबधिर रुग्णांची तपासणी झाल्यानंतर त्या रुग्णाला गरज भासल्यास सवलतीच्या दरात कानाच्या मशिंनचेही वाटप करण्यात येणार आहे.

## आज चिल्हे येथे इ.८ वी शिष्यवृत्ती परीक्षा मार्गदर्शन शिबिराचे आयोजन

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

आज शनि.दि.१० डिसेंबर रोजी चिल्हे येथे सकाळी १० ते दु.४ या वेळेत इ.८ वी शिष्यवृत्ती परीक्षा मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. वा.ना. दांडेकर जन्मशताब्दी वर्षानिमित्त वा. ना. दांडेकर शिक्षक प्रशिक्षण केंद्र, ज्ञान प्रबोधिनी पुणे व एक्सेल उद्योग समूह, रोहा तसेच माध्यमिक मुख्याध्यापक संघ,रोहा यांच्या संयुक्त विद्यमाने, तालुक्यातील सर्व माध्यमिक शाळांसाठी इ. ८ वी शिष्यवृत्ती परीक्षा शिक्षक मार्गदर्शन वर्गाचे आयोजन श्रमिक विद्यालय चिल्हे येथे करण्यात आले आहे.या मार्गदर्शन शिबिरातंर्गत गणित, बुद्धीमत्ता आणि भाषा या विषयातंर्गत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.तरी जास्तीत जास्त शिक्षकांनी या प्रशिक्षण वर्गासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.


### वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


# श्रीवर्धन आपत्तीग्रस्तांना मदत मिळणार कधी?

## अतिवृष्टीग्रस्तांना नुकसान भरपाई जाहीर, मात्र, पदरात अद्याप दमडी ही नाही

**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन तालुक्यामध्ये पावसाळी वादळी संकट येऊन अनेकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या अतिवृष्टीमुळे नुकसान ग्रस्तांना तात्काळ मदत मिळेल असे शासनाकडून जाहीर करण्यात आले. मात्र, या नुकसान ग्रस्तांना सात महिने उलटूनही भरपाईची मदत अद्याप मिळाली नाही.

तालुक्यात जुलै, ऑगस्ट या पावसाळी दिवसात श्रीवर्धन तसेच बोर्लीपंचतन परिसरात चक्रीवादळामुळे अनेक ठिकाणी नुकसान झाले. काहींचे कौलारू छप्पर कोसळले तर काहींना आपल्या व्यवसायिक साहित्य पाण्यामुळे खराब झाल्याने मोठया प्रमाणात आर्थिक नुकसानीचा फटका बसला आहे. यामध्ये १२ घरांचे तर ५ गुरांच्या गोठ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाल्याची नोंद पंचनामे नुसार प्रशासनाकडे करण्यात आली. मात्र, या वादळातील नुकसान ग्रस्त अद्याप मदतीच्या प्रतीक्षेत आहेत.

गेली सात महिने या नुकसान ग्रस्तांना सरकारी दप्तरी हेलपाटे मारल्याशिवाय पर्याय उरला नाही. कारण तात्काळ मिळणाऱ्या मदतीची माहिती देण्यास अधिकाऱ्यांची टाळाटाळ होत आहे. प्रस्ताव वरिष्ठांकडे पाठवल्याच उत्तरा शिवाय दुसरी माहिती मिळतच नाही. त्यामुळे शासनाने दिलेली मदत शेवटच्या माणसापर्यंत पोहोचण्यासाठी प्रशासन व लोकप्रतिनिधीचे प्रयत्न अपुरे ठरत आहे हीच बाब पुन्हा सिद्ध होत आहे.

वादळातील ग्रामस्थांना नुकसान भरपाई मिळावी यासाठी तत्काळ पंचनामे करण्यात आले. परंतु आद्यापी काही नुकसानग्रस्तांना नुकसान भरपाई प्राप्त झाली नाही.

मात्र, तलाठी, तहसील कार्यालय आणि बँकातून सर्वसामान्यांचे हेलपाटे सुरूच आहेत. आता नुकसानग्रस्तांना मदत कधी मिळणार याची प्रतीक्षा आहे. प्रशासनाकडून लवकरात लवकर मदत मिळावी. अशी मागणी ग्रामस्थ करीत आहेत.

> ऑगस्टच्या ९ तारखेला अतिवृष्टीमुळे राहत्या घराचे मोठे नुकसान झाले. त्यासोबतच व्यवसायिक सामुग्रीची संपूर्ण खराबी झाली. तातडीने पंचनामा सुध्दा करण्यात आला. मात्र, आज पाच महिने फेऱ्या मारत आहे. नक्की नुकसान भरपाई माहिती कोणाकडे मिळेल याचा ठावठिकाणा लागत नाही. प्रशासन देखील आव्हान करत नाही.
>
> – सुनील भाटकर, बोर्लीपंचतन

## जेएनपीए बंदरात ग्रीन पोर्ट इनिशिएटिव्हवर कार्यशाळा संपन्न



**दै.रायगड नगरी । उरण**

जेएनपीए मध्ये 'ग्रीन पोर्ट इनिशिएटिव्ह' या विषयावर एका कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन जेएनपीएचे उपाध्यक्ष उन्मेष वाघ यांनी केले. यावेळी जेएनपीए सर्व विभागाध्यक्ष आणि इतर अधिकारी उपस्थित होते. ग्रीन शिपिंग, पर्यायी इंधनाचा वापर आणि शाश्वत विकासाबाबत जागरूकता निर्माण करणे हा या कार्यशाळेचा उद्देश होता.जेएनपीएने कार्बन उत्सर्जन कमी करण्याच्या उद्देशाने अनेक हरित उपक्रम हाती घेतले आहेत. ज्यामध्ये सौर ऊर्जा पुरवठा, ई-वाहनांचा का उपयोग, किना-यावर वीज पुरवठा इत्यादींचा समावेश आहे.

बंदर आणि शिपिंग क्षेत्राशी संबन्धित शून्य-कार्बन ऊर्जा क्षेत्रा हरित पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करणे आवश्यक आहे. जेएनपीए शाश्वत विकासासाठी वचनबद्ध असून आम्ही उत्सर्जित कार्बन अवशोषित करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण केले असल्याचे जेएनपीएचे उपाध्यक्ष उन्मेष वाघ यांनी म्हटले.या कार्यशाळेत उद्योग जागतातील तज्ञांनी ग्रीन शिपिंग, जेएनपीएमधील तेल गळती प्रतिसाद प्रणाली, जवाहरलाल नेहरू बंदराची पर्यावरणीय देखरेख योजना आणि जेएनपीए येथील ग्रीन पोर्ट उपक्रमांवर आयोजित चर्चासत्रात भाग घेतला. ग्रीन शिपिंगसाठी एलएनजी, हायड्रोजन, मिथेनॉल इत्यादी पर्यायी इंधनांचा वापर करण्याची गरज असल्याचे कार्यशाळे दरम्यान अधोरेखित करण्यात आले.

मेरीटाइम इंडिया व्हिजन २०३० अंतर्गत, ६० टक्के अक्षय उर्जेचा वापर करण्याचा जेएनप-ीएचा मानस आहे. बंदरातील टर्मिनल्ससाठी आरओबीचे बांधकाम/फेरफार सह डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर (ऊฺฺउ) रेक हाताळणी सुलभ करण्यासाठी जेएनपीए बंदरात एकात्मिक कॉमन रेल यार्ड सुविधा विकसित करीत आहे. निर्यात कार्यक्षमतेमध्ये सुधारणा करण्यासाठी आणि जलद लोडिंग ऑपरेशन साठी जेएनपीएने ई-आरटीजीसीचा वापर सुरू केला आहे. या उपक्रमामुळे डिझेलचा वापर आणि वायू प्रदूषण कमी झाले आहे. आम्ही बंदर परिसरातील तलावांचे पुनरुज्जीवन करण्याचा उपक्रम सुद्धा हाती घेतला आहे.जेएनपीए परिसरात ४ -५ तलाव आहेत. ज्यांचे आम्ही जैविक तंत्र वापरून पुनरुज्जीवन करणार आहोत.

जेएनपीए टग बोट आणि बंदर क्राफ्ट्सना किनाऱ्यावर वीज पुरवठा करीत आहे. जेएनपीएने आपल्या ताफ़्यामध्ये सामील केलेल्या विद्युत वाहनांवर सोलर पॅनल बसवले आहेत. जेएनपीए ने कार्गो हाताळणी, साठवण, निर्वासन आणि पर्यावरण संरक्षणाशी संबंधित इतर अनेक गतिविधि उदा: मल्टी फ्युएल (सीएनजी/इलेक्ट्रिक/एलएनजी), किना-यावर वीज पुरवठा, एलएनजी बंकरिंग, एनर्जी एफिशियन्सी स्मार्ट लाइटनिंग, ग्रीन बेल्ट कव्हर, जलसंधारण,सांडपाणी प्रक्रिया, २.५मेगावाट क्षमतेचा प्रस्तावित सौर ऊर्जा प्रकल्पासह बंदरातील सर्व गतिविधिंसाठी एक कृती आराखडा तयार केला आहे.याशिवाय जेएनपीए हरित, शाश्वत आणि उज्वल भविष्यासाठी पर्यावरणीय समतोल राखण्याच्या उद्देशाने पुरेशा उपाययोजना करीत आहे.

## शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने लहान मुलांसाठी गोवर लसीकरण मोहीम संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने तसेच शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्ष खारघर यांच्या प्रयत्नाने पनवेल तालुक्यात प्रथम लहान मुलांकरिता गोवर लसीकरण मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेचे उदघाटन महाकाली मंदिर, सेक्टर -११ खारघर या ठिकाणी शिवसेना जिल्हाप्रमुख रायगड शिरीष घरत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शिवसेना महानगर समन्वयक दिपक घरत, उपमहानगर प्रमुख प्रकाश गायकवाड, शहर प्रमुख गुरुनाथ पाटील, उपशहर संघटक विद्याधर गोंगुरवर, शाखा प्रमुख संतोष शिंदे, महाकाली मंदिर ट्रस्ट क्या अध्यक्षा सौ. प्रणाली



गुरुनाथ पाटील तसेच शिवसेना पदाधिकारी व लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जे.एस.एम.च्या राष्ट्रीय सेवा योजना श्रमसंस्कार शिबिरात आरोग्य तपासणी संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

अलिबाग तालुक्यातील मौजे मानीभुते येथे जे.एस.एम.महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या श्रमसंस्कार शिबिरात जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या सहाय्याने विद्यार्थ्यांची एच.आय. व्ही.एड्स व सिकलसेल तपासणी व किशोरवयीन मुलांच्या समस्या याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

या प्रसंगी मनिभुते ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ.अस्मिता म्हात्रे, एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्षाचे कार्यक्रम व्यवस्थापक श्री. संजय माने, समुपदेशिका सौ.अपर्णा करंदीकर, समुपदेशक श्री सचिन जाधव, सिकलसेल समुपदेशक श्री प्रतिम सुतार, टेक्निशियन सौ.सुजाता तुळपुळे, रुपेश म्हात्रे, श्री अतिश नाईक, सौ.रुचिता म्हात्रे, सौ.मीनाली साळवकर रेश्मा म्हात्रे, दीपा म्हात्रे, तसेच राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.प्रविण गायकवाड, डॉ.सुनील आनंद, डॉ. प्रीती फाटे, प्रा. संतोष हाके तसेच एच. आय. व्ही. व स्वयंसेवक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरवातीला श्री.संजय माने यांनी एच.आय.व्ही.एड्स विषयी मागदर्शन व समुपदेशन करताना विद्यार्थ्यांना सांगितले की, प्रत्येकाने लग्नापूर्वी ब्रह्मचार्य वृत्त पाळावे व लग्नानंतर जोडीदाराशी एकनिष्ठ राहावे, जेणेकरून कोणालाही एच.आय व्ही.ची लागण होणार नाही. त्यानंतर श्री.प्रतिम सुतार यांनी सिकलसेल याविषयी मार्गदर्शन केले. यामध्ये सिकलसेल आजाराची करणे लक्षणे याविषयी समुपदेशन केले.

सौ. अपर्णा करंदीकर यांनी विद्यार्थ्यांना किशोरवयीन मुलांच्या समस्या याविषयी मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांशी त्यांच्या शंका व प्रश्नाबाबत चर्चा केली. त्यानंतर प्रत्यक्ष विद्यार्थ्यांच्या आणि मानीभुते गावतील ग्रामस्थांच्या एच.आय.व्ही.एड्स तपासणी करण्यात आली. यामध्ये ८० विद्यार्थी व २० ग्रामस्थ यांची एच.आय.व्ही ची तपासणी करण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. दिव्या धिवरे या विद्यार्थिनीने केले तर आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रविण गायकवाड यांनी केले. या आरोग्य तपासणी शिबिराचे यशस्वीरित्या आयोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.प्रविण गायकवाड, डॉ. सुनील आनंद, डॉ. सौ. मिनल पाटील यांनी केले.

## जिल्ह्यात गोवर परिस्थिती नियंत्रणात मात्र नागरिकांनी लसीकरण मोहिमेस सहकार्य करावे : जिल्हाधिकारी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्याचे आरोग्य मंत्री प्रा.डॉ.तानाजी सावंत यांनी राज्यातील गोवर परिस्थितीचा आढावा घेताना गोवर उद्रेक प्रतिबंध व नियंत्रण संदर्भात टास्क फोर्स सभा घेण्याची सूचना व्ही.सी. व्दारे दिली होती. त्यानुसार दि.०२ डिसेंबर २०२२ रोजी जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा टास्क फोर्सची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झाली.



या बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सुधाकर मोरे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुहास माने, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ.प्रताप शिंदे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. रविंद्र रोकडे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) श्रीमती पुनिता गुरव, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्रीमती ज्योत्सना शिंदे तसेच इंडियन मेडिकल असोसिएशन (आय.एम.ए) चे अध्यक्ष डॉ. विनायक पाटील उपस्थित होते.

या बैठकीमध्ये गोवर उद्रेक व उपाययोजना याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी आरोग्य विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना सार्वजनिक विभागाव्यतिरिक्त सर्व शासकीय विभागांकडून मदत घेण्यात यावी, महिला व बालविकास विभाग, शिक्षण विभाग, वैदयकीय शिक्षण विभाग, ग्रामपंचायत विभाग सर्वेक्षणात मदत घ्यावी, आय.एम.ए, निमा, आय.ए.पी या सारख्या खाजगी वैद्यकीय व्यवसायिक यांच्याकडूनही मदत घ्यावी, लसीकरण जनजागृती आपल्या क्षेत्रामध्ये प्रभावीपणे करावी, लसीकरण व सर्वेक्षण कृती आराखडे प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रामध्ये तयार करण्यात यावे, ताप, पुरळ रुग्णांचे गतिमान सर्वेक्षण करण्यात यावे, जिल्हयातील गोवर हॉटस्पॉटचा शोध घेवून स्थानिक सूक्ष्म कृती आराखडा तयार करण्यात यावा, अशा सूचना दिल्या. तसेच नागरिकांनी घाबरु नये, कोणत्याही परिस्थितीचा यशस्वीपणे सामना करण्यासाठी जिल्हा प्रशासन व आरोग्य यंत्रणा सर्व प्रकारे सज्ज असून जिल्हा प्रशासनाकडून राबविण्यात येणाऱ्या लसीकरण मोहिमेस नागरिकांनी सर्व प्रकारे सहकार्य करावे, असे आवाहन सध्या रायगड जिल्ह्यामध्ये गोवर प्रभावित भागामध्ये एकूण २६ सर्वेक्षण पथके कार्यरत आहेत, १० हजार ९६२ घरांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. १४ हजार ९२ बालकांना गोवर रुबेलाचा पहिला डोस देण्यात आला आहे. तसेच १२ हजार ७५७ बालकांना गोवर रुबेलाचा दुसरा डोस देण्यात आला आहे.

गोवर हा विषाणूमुळे होणारा संसर्गजन्य आजार आहे. हा लसीकरणामुळे टाळता येणार आजार आहे. हा आजार मुख्यत्वे पाच वर्षाखालील मुलांमध्ये आढळतो. ताप, खोकला, वाहणारे नाक, डोळयांची जळजळ सुरुवातीला चेहऱ्यावर व नंतर उर्वरीत शरीरावर लाल सपाट पुरळ ही या आजाराची प्रमुख लक्षणे आहेत. गोवरमुळे मुलांमध्ये अतिसार, मध्य कर्ण संसर्ग, न्युमोनिया, क्वचित फेफडे, अंधत्व किंवा मेंदू संसर्ग अशी गुंतागुंत होवू शकते. हा आजार लसीकरणामुळे टाळता येणारा आजार आहे.

रायगड जिल्ह्यात माहे जानेवारी २०२२ पासून खालापूर तालुक्यात ६ रुग्ण, पनवेल २ रुग्ण, उरण ६ रुग्ण असे एकूण १४ रुग्ण आढळले आहेत. तसेच ०१ एप्रिल २०२२ पासून १२३ रुग्णांचे नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत. त्यापैकी १४ बालके गोवर पॉझिटीव्ह आली आहेत. यावर्षी रायगड जिल्हयात एका रुग्णाची नोंद झाली असून ज्या भागात या रुग्णांची नोंद झाली आहे त्या भागात गोवर रुबेला लसीची अतिरिक्त मात्रा नऊ महिने ते पाच वर्षे वयोगटातील बालकांना देण्यात आली आहे. तसेच या बालकांसाठी विशेष व नियमित सत्रामध्ये लसीकरण करण्यात येत आहे.

जिल्हास्तरावर २ हजार ८० डोस, तर प्राथमिक आरोग्य केंद्रावर २२ हजार १५० गोवर रुबेला लससाठा उपलब्ध आहे. रायगड जिल्हयामध्ये सध्या सुरु असणाऱ्या गोवर उद्रेकाच्या पार्श्वभूमीवर सर्व नागरिकांनी आपल्या कुटुंबातील नऊ महिने ते पाच वर्ष वयोगटातील बालकांना यापूर्वी लस दिली नसल्यास तात्काळ या बालकांचे लसीकरण करुन घ्यावे. गोवर रुबेला लस सर्व शासकीय दवाखाने, प्राथमिक आरोग्य केंद्र उपकेंद्र या ठिकाणी मोफत उपलब्ध आहे.

नागरिकांनी घाबरु नये, कोणत्याही परिस्थितीचा यशस्वीपणे सामना करण्यासाठी जिल्हा प्रशासन व आरोग्य यंत्रणा सर्व प्रकारे सज्ज असून जिल्हा प्रशासनाकडून राबविण्यात येणाऱ्या लसीकरण मोहिमेस नागरिकांनी सर्व प्रकारे सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सुधाकर मोरे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुहास माने, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ.प्रताप शिंदे यांनी केले आहे.

## तळोजात ११३ रिक्षा चालकांवर कारवाईचा बडगा

### पनवेलमध्येही दिवसभरात ८३ जण लागले कारवाईच्या गळाला

**दै.रायगड नगरी । पनवेल**



तळोजा परिसरात स्थानिक वाहतूक शाखेच्या पथकाने उपप्रादेशिक परिवहन विभागाच्या सहकार्याने कायद्याची पायमल्ली करणाऱ्या ११३ मुजोर रिक्षाचालकांवर दंडात्मक आणि फौजदारी कारवाईचा बडगा उगारला. पनवेलमध्येही काल दिवसभर ८३ रिक्षाचालकांना कारवाईचा गळ लावला. प्रवासी आणि सामान्य नागरिकांनी या कारवाईचे उत्स्फूर्त स्वागत केले आहे. ही मोहीम मध्येच खंडित होऊ नये अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.

पनवेल महापालिका क्षेत्रातील पनवेल, नवीन पनवेल, कामोठे, खांदा कॉलनी, कळंबोली, तळोजे, खारघर शहरात रिक्षा चालकांची प्रचंड दहशत असून मीटर प्रमाणे भाडे न आकरता प्रवाशांची आर्थिक लूट चालविली आहे. या पार्श्वभूमीवर पनवेल संघर्ष समितीचे अध्यक्ष कांतीलाल कडू यांनी रिक्षा चालक, प्रवासी यांची संयुक्तिक बैठक घेवून जनजागृती आणि प्रबोधन केले होते. त्यानंतर उपप्रादेशिक परिवहन खात्याच्या उच्चस्तरीय अधिकाऱ्यांसोबत कारवाईकरीता नियोजनबद्ध कार्यक्रमाची आखणी केली. त्यानुसार बैठकीत ठरल्याप्रमाणे प्रादेशिक परिवहन अधिकारी अभय देशपांडे, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अनिल पाटील आणि वाहतूक विभागाचे पोलिस उपायुक्त तिरुपती काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली दोन्ही विभागाने संयुक्तिक कारवाई करण्याची मोहीम आखली आहे.

त्यानुसार काल पनवेल वाहतूक खात्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय नाळे व त्यांचे पथक तसेच आरटीओ अधिकाऱ्यांच्या पथकातील मोटरनिरीक्षक निलेश धोटे, ठोंबरे आणि विधाते तसेच पथकाने काल दिवसभरात पनवेल विभागात ८३ तर आज तळोजे वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक महेश पाटील यांनी आरटीओ विभागाच्या पथकासह ११३ रिक्षा चालकांवर कारवाई केली. त्यातून काहींवर दंडात्मक तर काहींचे परमिट गोठविण्यात आले.

या कारवाईमुळे रिक्षा चालकांना चांगलाच लगाम लागणार आहे. साहजिकच त्यांची भंबेरी उडाली आहे. मात्र सर्वसामान्य नागरिक, प्रवासी वर्ग, विषशेत: महिला प्रवासी वर्गाने कारवाईचे उत्स्फूर्त स्वागत केले आहे. ही कारवाई पेल्यातील वादळ ठरू नये तर रिक्षा चालकांना कायमचे वळण लागून मीटर प्रमाणे भाडे आकारणी आणि प्रवाशांशी सौजन्याने वागायला प्रवृत्त करेपर्यंत मोहिनी यशस्वी करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते कांतीलाल कडू यांनी केली आहे.

## सुप्रिया जेधे यांना राष्ट्रपतींच्या हस्ते प्रदान होणार सावित्रीची लेक पुरस्कार

**दै.रायगड नगरी । अलिबाग**



दिल्ली येथील महाराष्ट्र सदन येथे सौ.सुप्रिया जेधे यांना जनकल्याण सेवा संस्था यांच्याकडून सावित्रीची लेक पुरस्कार राष्ट्रपतींच्या हस्ते दि. ३ जानेवारी २०२३ रोजी दिला जाणार आहे. श्रीमती जेधे यांना त्या सामाजिक कार्यात देत असलेल्या योगदानासाठी सन्मानित केले जाणार आहे. महात्मा ज्योतिराव फुले समाजभूषण पुरस्कार ग्लोबल गोल्ड स्टार अवॉर्ड २०२२ साठीही त्यांची निवड झाली आहे.

सौ.सुप्रिया जेधे यांनी जिल्हा प्रशासनाच्या सहकार्याने सुरभी स्वयंसेवी सामाजिक संस्थेच्या माध्यमातून संविधान जनजागृती, स्वच्छ भारत स्वस्थ भारत, राष्ट्रीय एकात्मता, फटाके विरोधी अभियान, समुद्रकिनारे स्वच्छता मोहीम, गणपती दान व इको फ्रेंडली गणपती, त्यासाठी कृत्रिम तलावाची निर्मिती, वनराई बंधारे, अंधश्रद्धा निर्मूलन व वैज्ञानिक दृष्टीकोन, व्यसनमुक्ती व महिला सक्षमीकरण इत्यादी सामाजिक उपक्रम तसेच कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर लॉकडाऊन कालावधीत केलेले कार्य, वृक्षारोपण व पाणलोट विकास या क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात येणार आहे.